महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२३/ ३०५२ दिनांक: 19 JUL 2023

**संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी**

**कालमर्यादित : दि. २१ जुलै, २०२३**

प्रति,
प्राचार्य,
पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था,
औरंगाबाद विभाग.

विषयः - शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेशासाठी (CAP) अभ्यासक्रमनिहाय संस्थांची माहिती पडताळणी करुन उपलब्ध जागांची निश्चिती करणेबाबत...

संदर्भ:- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम/विद्यार्थी संस्था बदल/२०२३/५०९, दि. २६/०६/२०२३.

२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम/Intake Approval /DSD/ २०२३/५८५, दि. १९/०७/२०२३.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेशासाठी (CAP) प्रवेशासाठीचे संपूर्ण वेळापत्रक घोषित करण्यात आलेले आहे. त्यानूसार लवकरच प्रवेश फेऱ्यांची सुरुवात होणार आहे. याकरीता संस्थेची अभ्यासक्रमनिहाय उपलब्ध जागा व अनुषंगीक माहिती अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता शासन मान्यता व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची संलग्नता या कागदपत्रांच्या आधारे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये या संस्थांचा समावेश प्रथमवर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत करण्यात आला होता. अशा संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३ २४ करीता थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेशासाठी (CAP) प्रथम वर्षात रिक्त राहिलेल्या जागा व प्रथम वर्षाकरीता मान्य असलेल्या प्रवेश क्षमतेच्या १० टक्के जागांची गणना करुन प्रवेशासाठी उपलब्ध जागांची निश्चित करण्यात येते. पुढे असेही नमूद करण्यात येते की, संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी पदविका संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम बदल तसेच संस्था बदल करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

**तरी, सदर माहितीची संवेदनशीलता कालमर्यादा लक्षात घेता, सदर माहिती संबंधित संस्थांनी दि. २० जुलै, २०२३ पर्यंत संबंधित प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करावी. उपलब्ध जागा व अनुषंगिक माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास तसेच माहिती दि. २० जुलै, २०१३ पर्यंत अद्ययावत न केल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उभ्दवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.**

(उमेश नागदेवे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यलयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

\\dataserver\kamblesir\shikshanvibhakrk\all institute letter २०२३.docx